## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. ५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०१/२०१८

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून लैंगिक छळ केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २२/०१/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हा शाळेतील वर्ग खोलीत बेन्च वर अल्पवयीन फिर्यादी ही एकटी बसली असतांना यातील आरोपी हा वर्ग खोलीत जावुन फिर्यादीचा विनयभंग करून तिचा लैगीक छळ केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४ (अ),(१) भादंवि. सहकलम ६,८ बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधळ कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) क्षुल्लक कारणा वरून लाकडी काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २३/०१/२०१८ चे २०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ओमप्रकाश भिमराव ऊईके वय ४५ वर्ष रा. गांधी वार्ड भोजापुर  हा त्याचे घरासमोर ऊभे असतांना यातील अरोपीने विनाकारण तु पुन्हा या घरी यायचे नाही व गावात दिसायचे नाही, असे म्हणुन लाकडी काठीने डोक्यावर मारल्याने व मारण्या—पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. परीक्षण अहवाला वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/०१/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही एकटी घरी हजर असतांना यातील आरोपी हा फिर्यादीचे अंगणात येवुन तु माझ्या घराच्या मुंगण्याच्या झाडाच्या फांदया काटायला लावल्या म्हणुन शिवीगाळ केली व फिर्यादीने आरोपीला म्हणाले की या बाबत लाईनमेनला जावुन विचार असे बोलली असता, तिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून तीचे अंगावर धावुन साडी व ब्लावुज ओढुन मारहान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,३२३,३५५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) तरूणाचा मृत्यु. :—**

दिनांक २४/०१/२०१८ चे ०१.२० वाजता. दरम्यान यातील मृतक निकेश सुरेश मोटघरे वय २५ वर्ष, रा. गुळेगाव यास नातेवाईकांनी ग्रा.रू. पवनी येथे नेले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्याण तरूणीचा मृत्यु :—**

दिनांक २४/०१/२०१८ चे ०६.०० वाजता. दरम्यान यातील मृतक निशा देवीदास कावळे वय २० वर्ष, रा. रोहनी हीने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने तिला उपचारा कामी ग्रामीण रूग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावली, असे फिर्यादी मंगेश मनोहर गभने वय ३२ वर्ष रा. रोहनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पो.स्टे  लाखांदुर हे करीत आहेत.

६) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–

दिनांक २४/०१/२०१८ चे ०६.१० वाजता. दरम्यान यातील मृतक संजय रामभाऊ शिवनकर वय ४९ वर्ष, रा. लाखनी यांनी बॅकेच्या कर्जाच्या तनावामुळे स्वत:चे घरी गळफास लावुन आत्महत्या केली असे फिर्यादी हेमंत खोमेश्वर कोरे वय २८ वर्ष रा. मुरमाडी/ सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

७) जळाल्याने इसमाचा मृत्यु:–

दिनांक २३/०१/२०१८ चे १६.५० वाजता. दरम्यान यातील मृतक पाडुरंग चिंतामण बांते वय ७५ वर्ष, रा. बेटाळा हा आपले घरी बिडी पित असतांनी तो जळाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. हाके यांचे रिपोर्ट वरून य पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

८) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:–

दिनांक २४/०१/२०१८ चे १९.४० वाजता. दरम्यान यातील मृतक रामप्रसाद शामराव भुरे वय ४५ वर्ष रा. आंबाळी याने अती दारू सेवन केल्याने त्याचे छातीत दुखत असल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्याण्न मरण पावल्याने फिर्यादी मनोहर पाडुरंग धुर्वे वय ३९ वर्ष रा. आंबाळी यांचे तोडी रिपोट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०१/२०१८ चे १६.२० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही बावणकर चौक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सरतर्फे पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०१/२०१८ चे १४.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील तिन चाकी ऑटो ही राजेन्द्रनगर तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सरतर्फे पोहवा. कळंबे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०१/२०१८ चे १६.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील महेन्द्रा मॅक्स वाहन ही तांबी चौक तुमसर येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी सरतर्फे पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**१२) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक २४/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन सिहोरा व साकोली येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू + ३०० किलो सडवा मोहा पास किंमती १३,८००/–रु, तसेच जुगारातुन किंमती १३,००/–रु. असा एकुण किंमती १५,१००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २४/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी– ०२ तीन सिटर वाहनांवरती– ०७ केसेस व ईतर वाहनांवरती – ७२ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.